International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनाचा चिकित्सक अभ्यास

**श्री. सचिन ताराचंद धुर्वे**

*सहाय्यक प्राध्यापक,*

*श्री. यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर.*

***Corresponding Author - श्री. सचिन ताराचंद धुर्वे***

**DOI - 10.5281/zenodo.10952026**

**गोषवारा:**

*भारतीय समाजातील दुर्बळ व मागासलेल्या घटकांच्या कल्याणासाठी काही खास तरतुदी करून ठेवल्या आहेत. भारतात आदिवासी समाज म्हणजेच अनुसूचित जमात हा घटक सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे. समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरूध्दचा हक्क दिला आहेच पण त्याचबरोबर राज्यघटनेतील २४४ व्या कलमात आदिवासीच्या विकासासंबंधी तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानूसार आदिवासी जमातीचे वास्तव्य असलेल्या प्रदेशांना राष्ट्रपती अनुसूचित प्रदेश म्हणून घोषित करू शकतो. त्यानुसार जमीन हस्तांतर प्रतिबंध, सावकारी नियंत्रण व आदिवासी सल्लागार मंडळ स्थापन करून आदिवासीच्या विकास प्रश्नावर लक्ष केंद्रीत केले जाते. राज्यघटनेतील कलम २७५ (१) प्रमाणे आदिवासी कार्य मंत्रालयांतर्गत अर्थसहाय्य पुरविले जाते. राखीव जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे आदिवासी कार्य मंत्रालयांतर्गत अर्थसहाय्य पुरविले जाते. आदिवासींचे मुलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे, त्याचा विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी कल्याणकारी योजना त्याच्यासाठी राबविल्या आहेत. महाराष्ट्र शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या या योजनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.*

---

## संशोधनाचे उद्दिष्टे:

आदिवासी जमातीच्या विकासासाठी व आदिवासी लोकांचा जीवनस्तर वाढविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने विविध योजना राबविल्या आहेत. आदिवासी जमातीची जीवनशैली, त्यांचा शैक्षणिक स्तर, त्याचप्रमाणे त्यांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दर्जा उंचावण्याकरीता करण्यात आलेल्या उपायांचे, त्यांच्या आरोग्यविषयक सोयी, रोजगार उत्पन्न, कर्जबाजारीपणा, व्यसन इ. घटकाचा अभ्यास करावा लागतो.

१. सुसंस्कृत समाजापेक्षा आदिवासी समाज सर्व दृष्टीकोनातून अविकसित व मागासलेला असल्याने आदिवासींच्या विकासावर विविध घटकाचा होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.

२. कार्यक्षेत्रातील आदिवासींच्या उन्नतीसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे अध्ययन करणे.

३. आदिवासी शेतकरी, आदिवासी कामगार आणि भूमिहीन आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक थांबवण्याकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनांचे अध्ययन करणे.

४. शासनाच्या विविध योजनांबद्दल आदिवासी जमातीतील लोकांच्या उदासिनतेचे अध्ययन करणे.

५. महाराष्ट्र शासनाकडून अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनाचे अध्ययन करणे .

**आदिवासी समाज:**

रविंद्रनाथ टागोर यांच्या मते, "अनेक मरणांवर मात करुन पुन्हा उठण्याची ताकद असलेले डोंगरावरचे गवत जीवंत राहते." म्हणजेच अनेक संकटे व अडचणींवर मात करुन आदिवासी लोक आपले अस्तित्व जोपासताना दिसून येतात. 'धरतीची लेकरे' म्हणून ज्यांचा सर्वाथाने उल्लेख करता येईल, अशा आदिवासी समाजाने निसर्गाच्या सानिध्यात आपले जग वसविले. नैसर्गिक पर्यावरणात राहणाऱ्या आदिवासींना कोणी 'जंगलाचे राजे' म्हणतात तर कोणी त्यांना 'भूमिपुत्र' म्हणतात. भारतीय राज्यघटनेत त्यांचा उल्लेख 'अनुसूचित जमात' असा केला आहे.

अंधश्रध्दाळू, निरक्षर आणि स्वभावाने वेगळेपण जोपासणाऱ्या आदिवासी लोकांची प्रत्येक स्तरावर मात्र आर्थिक पिळवणूक करण्यात येऊ लागली. आज त्यांची परिस्थिती भयावह आहे. आदिवासी जमातीची होणारी आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी, आदिवासी जमातीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी, केंद्र सरकारने व राज्यसरकारने आदिवासी कल्याण कार्यक्रम हाती घेतला. या आदिवासी कल्याण कार्यक्रमातंर्गत आदिवासी लोकांचे जीवनमान सुधारणे, आदिवासी विदयार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्विकारणे, त्यांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता करणे, त्यांना लोकसभेवर तसेच विधानसभेवर प्रतिनिधित्व देणे, नोकरीमध्ये विशिष्ट प्रमाणात प्रतिनिधित्व देणे इत्यादी कार्यक्रम हाती घेतले.

**महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभाग:**

समाजकल्याण विभागांतर्गत आदिवासी कल्याण हा विभाग १९७२ सालापर्यंत कार्यरत होता. १९७२ साली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना झाली व पुढे १९७३ साली आदिवासी कल्याण विभाग स्वतंत्र करण्यात आला. परंतु काही काळ समाजकल्याण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालीच या विभागाचे काम चालू होते. सन १९७५-७६ साली राज्याला आदिवासी उपयोजना लागू झाली. त्यामुळे विकासकार्याची दिशा केवळ कल्याणकारी योजना अशी न राहता ती विकास

योजना (Welfare Schemes to Development Schemes) अशी करण्यात आली.

**अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी योजना:**

महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनाचा थोडक्यात आढावा.

**शासकीय आश्रमशाळा समूह योजना:**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून सन 1972-73 पासून निवासी आश्रम शाळा समूह योजना कार्यान्वित करण्यात0 आली आहे. सदर योजना प्रामुख्याने अतिदुर्गम, डोंगराळ व पाड्यातील अनुसूचित जमातीतील मुला-मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून शैक्षणिक दृष्ट्या त्यांना सुशिक्षित करणे व त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने राबवण्यात आली आहे. या योजनेनुसार 5000 ते 7000 लोकसंख्येच्या क्षेत्रात एक आश्रम शाळा हा निकष निर्धारित करण्यात आलेला आहे. सध्या स्थितीत महाराष्ट्रात एकूण 553 शासकीय आश्रम शाळा मंजूर असून त्यापैकी 499 शासकीय आश्रम शाळा कार्यरत आहेत. सन 2006-2007 हे शैक्षणिक वर्षापासून शासनाने पब्लिक स्कूलच्या धर्तीवर जिल्ह्यात ठिकठिकाणी इंग्रजी माध्यमांच्या शासकीय आश्रम शाळा सुरू करण्यास परवानगी दिली होती. त्यानुसार नंदुरबारला 03, पांढरकवडा 02 अशी 05 आश्रम शाळा सुरू करण्यात आले आहेत.

**अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांसाठी वीज पंप किंवा तेल पंप पुरवठा योजना** :

आदिवासी शेतकऱ्यांना त्यांचा शेती विकास करण्याच्या उद्देशाने 100 टक्के अनुदान तत्त्वावर वीज पंप / तेल पंप पुरवण्यात येत आहे. ही योजना सर्वसाधारणपणे तीन किंवा पाच अश्वशक्तीचे वीज पंप किंवा तेल पंप मंजूर करण्यासाठी वापरण्यात आली आहे. कमीत कमी दीड एकर व जास्तीत जास्त 16 एकर इतकी लागवडी योग्य जमीन उपलब्ध असणाऱ्या शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

**व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना:**

आदिवासी युवकांकरिता स्थानिक गरजांवर आधारित लहान-लहान प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवून त्यांना स्वयंरोजगारांची संधी देणे. तसेच आदिवासी भागातील लोकांना अत्यंत गरजेची यंत्रे व अवजारे स्थानिक रित्या दुरुस्त करून घेण्याच्या उद्देशाने दृष्टीने कुशल कारागीर उपलब्ध करून देणे हा योजनेचा मुख्य उद्दिष्ट आहे. या योजनेकरिता आदिवासी जमातीतील किमान नववी पर्यंत शिक्षण घेतलेला विद्यार्थी याचा लाभ घेऊ शकतो.

**आदिवासी हस्तकला प्रदर्शन:**

आदिवासी हस्तकला वस्तूंना शहरी भागात मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध असल्यामुळे अत्यंत दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी लोकांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तूंचे प्रदर्शन लावून त्याची विक्री करणे हा या योजनेचा उद्देश आहे. साधारणपणे हस्तकलाकार आदिवासी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

**वारली चित्रकला स्पर्धा योजना**:

ठाणे जिल्ह्यातील वारली या अनुसूची जमातीच्या पारंपारिक चित्रांना व त्यांच्या चित्रकलेस जगभर मान्यता मिळालेली आहे. या चित्रकलेचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने शासनाकडून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

**तुषार ठिबक सिंचन योजना**:

जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत तुषार ठिंबक सिंचन योजना राबवण्यात येत आहे. या योजनेनुसार जलस्त्रोत अपूर्ण असल्यामुळे उपलब्ध पाण्याचा सुयोग्य पद्धतीने परिणामकारक वापर करण्याच्या उद्देशाने ठिंबक व तुषार संच बसवण्याची पद्धत प्रचलित करण्यात आली आहे. त्यानुसार आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत अर्थ सहाय्य दिल्या जाते.

**शेळ्या मेंढ्यांचा गट पुरवठा करणे:**

अनुसूचित जमातीच्या आर्थिक स्थितीमध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने पशुसंवर्धन हा महत्त्वपूर्ण उपक्रम शासनाकडून राबविण्यात येते. या उपक्रमानुसार दहा शेळ्या व एक बोकड असा गट अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना 50 टक्के अनुदानावर पुरवण्यात येतो.

**पीक कर्ज योजना:**

आदिवासी सहकारी संस्थेच्या मार्फत आदिवासी सभासदांना अत्यंत सुलभ व सवलतीच्या दराने पीक कर्ज वितरित केले जाते. त्यावरील व्याजापोटी अनुदान शासनामार्फत अदा केले जाते परंतु मंजूर कर्जाची परतफेड 30 जूनच्या आत होणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:**

१. भारतीय राज्यघटनेनुसार सर्व नागरिक समान आहेतअसे असतानाही . महाराष्ट्रातील आदिवासींचा सामाजिक .दर्जा व राहणीमान निम्न दर्जाचा आहे आर्थिक दृष्टिकोनातून ते शोषित असून सामाजिक दृष्टिकोनातून ते मागास व बहिष्कृत आहेत आणि राजकीय दृष्टिकोनातून मोठया प्रमाणात वंचित .आहेत

२. कोणत्याही व्यक्तीचा सामाजिक, राजकीय दर्जा त्याच्या आर्थिक परिस्थितीवरुन ठरत असतोत्यामुळे आदिवासी जमातीच्या . आर्थिक स्थितीवरुन त्यांचा राजकीय .सहभाग अवलंबून आहे

३. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती व शिक्षण यांच्यातील सहसंबंध लक्षात घेता असे आढळून येते की, बहुसंख्य आदिवासी शिक्षणापासून वंचित राहिलेले दिसून येतात .

४. आदिवासी जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या भागात शासनाने अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या आहेतआदिवासींच्या विकासासाठी . .आदिवासी उपयोजना लागू केली आहे

५. आदिवासी जमातीमध्ये योग्य व प्रभावी नेतृत्वाचा अभाव असून हा त्यांच्या विकास प्रक्रियेतील मुख्य अडसर ठरत

आहेविद्यमान आदिवासी नेतृत्व . उदासिन, निरुत्साही, स्वार्थी व मोठया प्रमाणात गैर आदिवासी असल्याचे दिसून येतेत्यामुळे आदिवासी समाज आज . .दारिद्रयात खितपत पडलेला आहे

६. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ आदिवासीच्या सर्वांगीण उन्नतीसाठी एक साधन बनले आहे.
७. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबवल्या जात असलेल्या विविध योजनांचा लाभ आदिवासींना मिळत आहेत्यामुळे . आदिवासींच्या जिवनमानाचा स्तर .उंचावला आहे
८. आदिवासींच्या विकासासाठी शासनाकडून सुरू झालेल्या योजना आदिवासीपर्यंत पोहचवण्याचे एक माध्यम म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ कार्य करते आहे.
९. आदिवासी व शासन यांना जोडणारा दुवा आणि एक माध्यम म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ कार्य करते.

**उपाय :**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून खालील गोष्टी साध्य झाल्या पाहिजेत.

१. आदिवासी जमातीची आर्थिक स्थिती सुधारणे गरजेचे आहेशासकीय . विकास योजनेचा लाभ प्रत्येक गरजू त्यामुळे .व्यक्तीला झाला पाहिजे आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारेल आणि त्याच्या परिणामी हो त्यांच्या विकासात वाढईल.
२. शेती व्यवसाय बारमाही होण्यासाठी सिंचनाच्या पर्याप्त सोयी, सुधारित शेती ज्ञान उपलब्ध करुन दिल्यास त्यांना विविध पिके घेता येईल परिणामी आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारेल.
३. गावातच बाराही महिने रोजगार उपलब्ध करुन दयावा जेणे करुन आदिवासींचे स्थलांतरण होणार नाही. त्यामुळे आदिवासींची स्थिती .सुधारेल
४. आदिवासींना बोलीभाषेतून शिक्षण दिले जावे, व्यवसायाभिमुख शिक्षणाची व्यवस्था करावी . आश्रमशाळेतील व्यवस्थापकीय आज .सुधारणा गरजेची आहे आदिवासींना मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर शिक्षणाशिवाय .तरणोपाय नाही
५. विकास योजनेची संख्या जरी मोठी असली तरी लाभधारकांची संख्या मर्यादित आहेत्यामुळे बरेच लोक .

यासाठी .पात्र असूनही वंचित राहतात योजनेमधील लाभधारकांची संख्या तेव्हाच .वाढविणे गरजेचे आहे महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजनांचा .लाभ घेतील

६. विकास योजनांची अंमलबजावणी निःपक्षपणे आणि योग्य पध्दतीने झाल्यास गरजू व्यक्तीला त्याचा लाभ घेता येईलयातून आदिवासींचा . विकास योजनेतील सहभाग वाढेल आणि त्यांची आर्थिक स्थिती .उंचावण्यास मदत होईल

डोंगरदऱ्याच्या कुशीत वास्तव्याला असलेले आदिवासी लोक सामाजिकदृष्टया मागास, आर्थिकदृष्टया शोषीत आणि राजकीयदृष्टया मोठया प्रमाणात वंचित असलेले दिसून येतात. आदिवासी जमातीची होणारी आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी, आदिवासी जमातीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी, केंद्र सरकारने व राज्यसरकारने आदिवासी कल्याण कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे.

संदर्भ सूची:


१. नाडगोंडे गुरुनाथसामाजिक आंदोलने :, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९९६ .

२. कुलकर्णी विभारतातील आदिवासी :.श्री . वंश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आवृत्ती २००२.

३. कऱ्हाडे बीशास्त्रीय संशोधन पध्दती :एम., पिंपळापूरे ॲण्ड कंपब्लीशर्स ., नागपूर आवृत्ती पहिली .

४. मांडवकर भाऊ, (१९८१), “आदिम”, सेवा प्रकाशन, अमरावती.

५. http://www.Mahatribal.gov.in.